


दैनिक
अचूक वेध,अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : ३३२, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, सोमवार, दि.१३ जुलै २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## रेशन कार्डधारकांसाठी मोठी अपडेट; ३५ किलो रेशनचा नियम बदलणार?

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१२, नवी दिल्ली :** केंद्र सरकार म ोफत रेशन योजनेत मोठे बदल करण्याच्या तयारीत आहे. सध्या कुटुंबाच्या आधारावर दिले जाणारे रेशन भविष्यात प्रत्येक व्यक्तीच्या आधारावर देण्याचा प्रस्ताव सरकारने मांडला आहे. यासाठी राष्ट्रीय अन्न सुरक्षा (दुरुस्ती) विधेयक, २०२६ चा मसुदा तयार करण्यात आला असून, त्यावर १३ जुलैपर्यंत हरकती आणि सूचना मागवण्यात आल्या आहेत. सध्या सार्वजनिक वितरण प्रणालीअंतर्गत एका पात्र कुटुंबाला ३५ किलो धान्य दिले जाते. नव्या प्रस्तावानुसार ही पद्धत बदलून प्रत्येक पात्र व्यक्तीला ७ किलो धान्य देण्याचा विचार आहे. या बदलाम ुळे धान्याचे वाटप अधिक समान आणि पारदर्शक होईल, असा सरकारचा दावा आहे.



केंद्र सरकार 'वन नेशन, वन राशन' योजना अधिक प्रभावीपणे राबवण्यासाठीही विविध सुधारणा करत आहे. त्याचाच एक भाग म्हणून हा बदल सुचवण्यात आला आहे. सध्या पंतप्रधान गरीब कल्याण अन्न योजना अंतर्गत देशातील सुमारे ८१ कोटी नागरिकांना मोफत धान्याचा लाभ दिला जातो.

**मोठ्या कुटुंबांवर काय परिणाम?**

सध्याच्या व्यवस्थेत कुटुंबात सदस्य कितीही असले तरी ठराविक प्रमाणात धान्य मिळते. त्यामुळे मोठ्या कुटुंबांना तुलनेने कमी धान्य मिळत असल्याची तक्रार होती. मात्र, नव्या प्रस्तावामुळे प्रत्यक्षात कोणत्या प्रकारच्या कुटुंबांना फायदा किंवा तोटा होईल, याबाबत चर्चा सुरू झाली आहे. विशेषतः पाचपेक्षा जास्त सदस्य असलेल्या कुटुंबांवर या बदलाचा परिणाम होऊ शकतो, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.

**स्मार्ट रेशन कार्डही लवकरच**

दरम्यान, राज्यातही रेशन वितरण प्रणाली अधिक पारदर्शक करण्यासाठी स्मार्ट रेशन कार्ड लागू करण्याची तयारी सुरू आहे. प्रत्येक कार्डवर स्वतंत्र ठ कोड असेल. तो स्कॅन केल्यानंतर लाभार्थ्यांची माहिती समोर येईल. त्यामुळे बोगस लाभार्थी ओळखणे, काळाबाजार रोखणे आणि पात्र व्यक्तींनाच योजनेचा लाभ मिळवून देणे सोपे होणार आहे.

रेशन कार्ड आधारशी जोडण्याची प्रक्रियाही सुरू असून, अपात्र किंवा जास्त उत्पन्न असतानाही योजनेचा लाभ घेणाऱ्यांची नावे यादीतून वगळण्याची कारवाई करण्यात येणार आहे.

## पाटणच्या विश्रामगृहाच्या निकृष्ट कामाचा नमुना?

### बांधकाम करत असताना भीत कोसळली

**अक्षराज : सुरेश संकपाळ**



**दि.१२, पाटण :** पाटण येथील शासकीय विश्रामगृहाच्या परिसरात सुरू असलेल्या कंपाउंड भिंतीच्या बांधकामादरम्यान भिंतीचा काही भाग अचानक कोसळल्याची घटना घडली. या प्रकारामुळे बांधकामाच्या गुणवत्तेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. काम पूर्ण होण्यापूर्वीच भिंत कोसळल्याने संबंधित ठेकेदार आणि बांधकाम विभागाच्या देखरेखीवर नागरिकांकडून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

शासकीय निधीतून लाखो रुपये खर्च करून उभारण्यात येणाऱ्या या कामामध्ये निकृष्ट दर्जाचे बांधकाम साहित्य वापरण्यात आले का? काम करताना आवश्यक तांत्रिक निकषांचे पालन करण्यात आले होते का आणि संबंधित अधिकाऱ्यांनी वेळोवेळी कामाची पाहणी केली होती का याची चौकशी होण्याची गरज आहे. विशेष म्हणजे, काम सुरू असतानाच भिंत कोसळल्यामुळे भविष्यात हे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे संपूर्ण कंपाउंड भिंतीची गुणवत्ता तपासून आवश्यक त्या दुरुस्ती आणि सुधारणा तातडीने करण्यात याव्यात, अशी मागणी होत आहे. या घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी कामाच्या गुणवत्तेची पोलखोल झाली आहे. संबंधित विभागाने या घटनेची गंभीर दखल घेऊन चौकशी करावी, दोषी आढळणाऱ्या ठेकेदार व अधिकाऱ्यांवर कारवाई करावी आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी कठोर उपाययोजना कराव्यात. अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

## ओबीसी जनगणनेसाठी चिमूर तालुक्याचा एल्गार; बेंगळुरू ते दिल्ली लढ्याची रणनिती निश्चित

**अक्षराज : नितेश पाटील**

**दि.१२, चिमूर (चंद्रपूर) :** राष्ट्रीय ओबीसी महासंघ व संलग्न महिला, कर्मचारी-अधिकारी, युवा, किसान, वकील आणि विद्यार्थी महासंघ यांच्या चिमूर तालुकास्तरीय नियोजन बैठकीत ओबीसी जनगणना, संघटन विस्तार, बेंगळुरू महाअधिवेशन आणि दिल्लीतील प्रस्तावित ठिय्या आंदोलनाबाबत म हत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. राष्ट्रसंत तुकडोजी मूकबधिर विद्यालय, चिमूर येथे झालेल्या बैठकीत ओबीसी समाजाच्या घटनात्मक हक्कांसाठी संघटितपणे लढा अधिक तीव्र करण्याचा निर्धार करण्यात आला.

बैठकीच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे चंद्रपूर जिल्हाध्यक्ष रामदास कामडी होते. प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय ओबीसी महिला महासंघाच्या जिल्हाध्यक्ष भावना बावनकर, प्रकाश पोतराजे, ममता डुकरे, तालुकाध्यक्ष यामिनी कामडी तसेच तालुका सचिव रामभाऊ खडसिंगे उपस्थित होते. बैठकीत ७ ऑगस्ट २०२६ रोजी बेंगळुरू येथे होणाऱ्या राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या ११ व्या महाअधिवेशनासाठी चिमूर तालुक्यातून मोठ्या संख्येने प्रतिनिधी सहभागी करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच २०२७ च्या जनगणनेच्या दुसऱ्या टप्प्यात ओबीसींसाठी स्वतंत्र कॉलमचा समावेश न झाल्यास, हिवाळी अधिवेशनादरम्यान नवी दिल्लीच्या रामलीला मैदानावर होणाऱ्या ठिय्या आंदोलनात चिमूर तालुक्यातून मोठ्या संख्येने सहभागी होऊन तन, मन आणि धनाने सहकार्य करण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला.

संघटन विस्ताराच्या दृष्टीने विविध नियुक्त्याही जाहीर करण्यात आल्या. राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या चिमूर तालुकाध्यक्षपदी प्रकाश पोतराजे यांची नियुक्ती करण्यात आली. जिल्हा उपाध्यक्षपदी ममता डुकरे व सौ. पुष्पा हरणे, राष्ट्रीय ओबीसी महिला महासंघाच्या तालुका सहसचिवपदी मीना चौधरी, चिमूर शहराध्यक्षपदी दुर्गा सातपुते, जांभुळघाट शहराध्यक्षपदी दुर्गा निवटे, तसेच राष्ट्रीय ओबीसी किसान महासंघाच्या तालुका कार्याध्यक्षपदी नथुजी वैरागडे व तालुका उपाध्यक्षपदी



मंगेश ठोंबरे यांची नियुक्ती करण्यात आली. अध्यक्षीय मार्गदर्शनात रामदास कामडी यांनी ओबीसी समाजाच्या घटनात्मक हक्कांसाठी संघटन अधिक मजबूत करण्याचे आवाहन केले. भावना बावनकर यांनी महिलांनी संघटनात्मक कार्यात सक्रिय सहभाग घेऊन समाजाच्या लढ्यात पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले.

बैठकीस प्रवीण वाघे, देवेंद्र मुंगले, धर्मदास पानसे, परमानंद बोरकर, राजकुम ार माथुरकर, ताराचंद बोरकुटे, पटवारी कोहपरे, राजू बनसोड, प्रेमिला ठाकरे यांच्यासह राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच राष्ट्रसंत तुकडोजी मूकबधिर विद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीचे प्रास्ताविक विदर्भ प्रदेश उपाध्यक्ष बालु सातपुते यांनी केले. सूत्रसंचालन तालुका कार्याध्यक्ष प्रभाकर पिसे यांनी केले, तर आभार प्रदर्शन राष्ट्रीय ओबीसी युवा महासंघाचे तालुकाध्यक्ष प्रदीप कामडी यांनी केले. आगामी बेंगळुरू महाअधिवेशन आणि दिल्लीतील ठिय्या आंदोलन यशस्वी करण्याच्या सामूहिक निर्धाराने बैठकीचा समारोप झाला.

## मुंबई-अहमदाबाद महामार्गावर एलएनजी गॅस टँकर पलटी

### पोलीस आणि गॅस कंपनीच्या पथकाकडून स्थानिक रहिवाशांना सतर्कतेच्या सूचना...





**अक्षराज : निलेश कासट**

**दि.१२, तलासरी(पालघर) :** मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर तलासरीनजीक असलेल्या सावरोली गावाच्या हद्दीत आज पहाटे चार वाजेच्या सुमारास एलएनजी (द्रवीकृत नैसर्गिक वायू) गॅस वाहून नेणारा एक महाकाय टँकर पलटी झाल्याची भीषण दुर्घटना घडली. टँकर महामार्गावरून खाली घसरल्याने गॅस गळतीचा आणि सुरक्षेचा मोठा धोका निर्माण झाला आहे. घटनेचे गांभीर्य ओळखून सर्व आपत्कालीन यंत्रणांसह पोलीस आणि गॅस कंपनीचे तांत्रिक पथक युद्धपातळीवर उपाययोजना करत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, सदर एलएनजी गॅस टँकर पहाटे चारच्या सुमारास मुंबई अहमदाबाद महामार्गावर सावरोली हद्दीतून मुंबईच्या दिशेने जात असताना चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने भीषण अपघात झाले.

वाहन चालक नसेत असताना अंधारात सावरोली उड्डाण पुलाजवळ नियंत्रण सुटल्याने हा अवजड टँकर क्रमांक (एल एन ०२ ए ए १४०१) महामार्गाच्या कडेला असलेल्या भागात जाऊन थेट डाव्या बाजूला उलटला. सुदैवाने, या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

घटनेची माहिती मिळताच आपत्कालीन यंत्रणा घटनास्थळी तैनात असून तलासरी पोलीस, महामार्ग पोलीस, डहाणू आणि सरीगाम अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले. तसेच एनएचएआय (छक्अख) हायवे पेट्रोलिंग टीम आणि ॲम्बुलन्स देखील सुरक्षेसाठी सज्ज ठेवण्यात आली आहे. एलएनजी गॅसचा धोका लक्षात घेता संपूर्ण परिसराला सुरक्षा दोरीने (कॉर्डन लाईन) वेढण्यात आले आहे. सुरक्षेचा उपाय म्हणून तत्काल केमिकल तज्ञाना पाचारण करण्यात आले तसेच दुर्घटनाग्रस्त अँकरच्या १०० मीटर परिसरातील नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविण्यात असून परिसर बंद करण्यात आला आहे.

पोलीस व गॅस कंपनीकडून नागरिकांना सतर्कतेचा इशारा देत अपघाताच्या अनुषंगाने महामार्ग पोलिस तलासरी पोलिस आणि गुजरात एनर्जी लिमिटेडचे डेप्युटी मॅनेजर ब्रिज पटेल यांच्यासह सेफ्टी ऑफिसर व तांत्रिक पथकाने अपघात स्थळाच्या आजूबाजूच्या रहिवासी भागात जाऊन नागरिकांशी थेट संवाद साधला.या पथकाने स्थानिक नागरिकांना आणि शेतकऱ्यांना अपघाताबाबतची संपूर्ण कल्पना दिली.

एलएनजी गॅस अत्यंत ज्वलनशील असल्याने सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणती काळजी घ्यावी, जसे की उघड्यावर शेकोटी किंवा आग न पेटवणे, या बाबत नागरिकांना योग्य त्या महत्त्वपूर्ण सूचना दिल्या जात असून सुरक्षिततेच्या दृष्टीने पोलीस आणि प्रशासनाकडून पुढील योग्य त्या सर्व उपाययोजना केल्या जात असून परिस्थितीवर पूर्ण नियंत्रण ठेवले जात आहे.

महामार्गावरील दुर्घटनाग्रस्त गॅस टँकर मधील गॅस तज्ञांच्या मदतीने दुसऱ्या टँकर मध्ये भरण्याचे (रिफील) करण्याचे काम सुरू केले असून त्याला सुमारे सहा ते सात तास लागण्याची माहिती संबंधित विभागाकडून देण्यात आली आहे.

## खासदार प्रणिती शिंदे यांच्या पाठपुराव्याला यश; वाखरीतील सर्व्हिस रोडचे काम पूर्ण

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.१२, पंढरपूर :** आषाढी वारी २०२६ च्या परतीच्या प्रवासादरम्यान लाखो वारकऱ्यांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी व वाखरी येथील पालखी मुक्कामाची परंपरा अबाधित राखण्यासाठी खासदार प्रणिती शिंदे यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे. त्यांच्या मागणीनंतर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने (छक्अख) वाखरी येथील सर्व्हिस रोडचे काम पूर्ण केल्याने परतीच्या वारीतील पालख्या, दिंड्या आणि वारकऱ्यांसाठी सुरक्षित मार्ग उपलब्ध झाला आहे.




आषाढी वारीदरम्यान खासदार प्रणिती शिंदे यांनी वाखरी येथे प्रत्यक्ष भेट देऊन पालखी मुक्काम स्थळाची पाहणी केली होती. त्यावेळी राष्ट्रीय महामार्गाच्या सुरू असलेल्या कामामुळे गावाकडे जाणारा मूळ रस्ता बंद असल्याने वारकरी, पालख्या आणि दिंड्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले होते.

यानंतर त्यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या पंढरपूर येथील प्रकल्प अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून चर्चा करून परतीच्या वारीपूर्वी सर्व्हिस रोडचे काम पूर्ण करण्याची मागणी केली. तसेच प्रकल्प संचालकांना निवेदन देऊन हे काम युद्धपातळीवर हाती घेऊन सात दिवसांत पूर्ण करण्याची मागणी केली होती.

निवेदनात त्यांनी आषाढी एकादशीनंतर संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज यांच्यासह विविध पालख्यांचा परतीच्या प्रवासातील पहिला मुक्काम वाखरी येथे होत असल्याने ही ऐतिहासिक व धार्मिक परंपरा अबाधित राखणे आवश्यक असल्याचे नमूद केले होते. तसेच सर्व्हिस रोड नसल्यास भरधाव वाहनांमुळे वारकऱ्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण होऊन अपघाताचा धोका वाढू शकतो, असेही त्यांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले होते.

या मागणीची दखल घेत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने तातडीने कार्यवाही करत वाखरी येथील सर्व्हिस रोडचे काम पूर्ण केले. त्यामुळे परतीच्या आषाढी वारीदरम्यान लाखो वारकरी, पालख्या आणि दिंड्यांना वाखरी गावात तसेच पालखी मुक्काम स्थळी सुरक्षितपणे पोहोचणे शक्य झाले असून, स्थानिक नागरिकांनीही याबद्दल समाधान व्यक्त केले आहे.

अक्षराज



संपादकीय

## पालखी सोहळा ; महाराष्ट्राचे वैभव!

आषाढ महिना सुरू झाला की वेध लागतात ते पंढरीच्या वारीचे. लाखो वारकरी देहू आणि आळंदीत जमा होतात. डोईवर तुळशी वृंदावन व विठ्ठल रखुमाईच्या मूर्ती हाती टाळ मृदंग, मुखी विठ्ठल, विठ्ठल जयहरी विठ्ठलचा गजर करीत, ज्ञानोबा – तुकारामांचा जयघोष करीत व खांद्यावर भागवत धर्माची भगवी पताका फडकवीत विठुरायाच्या भेटीसाठी लाखो वैष्णवांचा मेळा निघतो हे दृश्य डोळ्यांचे पारणे फेडणारे असते.

आषाढी वारी म्हणजे महाराष्ट्राचा लोकोत्सव!

पालखी सोहळा हे महाराष्ट्राचे वैभव आहे. १३ व्या शतकात ही परंपरा असल्याचे उल्लेख सापडतात. संतश्रेष्ठ ज्ञानोबा माऊलींच्या घराण्यात पंढरीच्या वारीची परंपरा होती. त्यांचे वडील वारीला जात असल्याचा उल्लेख आढळतो. ज्ञानदेवांनी भागवत धर्माची पताका खांद्यावर घेऊन सर्व जातीपातीच्या समाजाला एकत्रितपणे या सोहळ्यात सामील करुन घेतले. हेच व्यापक स्वरूप जपत एकनाथ महाराज तुकाराम महाराज यासारख्या संतांनी वारीची परंपरा पुढे चालवली.

गेली कित्येक वर्षे सुरू असलेली ही महाराष्ट्राची परंपरा आता देशातच नाही तर विश्वात लोकप्रिय झाली आहे. संपूर्ण महाराष्ट्रातून वारकरी व भाविक वारीमध्ये सहभागी होतात. महाराष्ट्रातूनच नव्हे तर गुजरात, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, कर्नाटक, तेलंगणा या राज्यातूनही लोक वारीमध्ये सहभागी होतात. आतातर परदेशातूनही लोक खास वारी अनुभवण्यासाठी महाराष्ट्रात येतात. दिवसेंदिवस वारीतील वारकऱ्यांची संख्या वाढत चालली आहे. १९६५ च्या सुमारास आळंदीच्या पालखीमध्ये पाच हजार वारकरी सहभागी झाल्याचा उल्लेख दि ब मोकाशी यांच्या पुस्तकात आढळतो. आज ती संख्या लाखोंच्या घरात पोहचली आहे. वृद्धांप्रामाणे तरुणही आता वारीत सहभागी होत आहेत. सहकुटूंब वारी करणाऱ्यांची संख्याही वाढली आहे. कुठलीही जाहिरात न करता, मार्केटिंग न करता लाखो भाविक वारीत सहभागी होतात.

वारी म्हणजे नियोजनाचे सर्वोत्तम उदाहरण!

मार्च महिन्यातच दिंडीचे नियोजन होते. दिंडीतील सहभागी वारकरी, आचारी, शिधा, मुक्कामाची सोय याचे सर्व नियोजन मार्च महिन्यातच होते. मार्च महिन्यात सुरू झालेले हे दिंडीचे नियोजन दिंडी पुन्हा गावी परत येण्यापर्यंतचे असते. वारीतील शिस्त तर काय वर्णवावी! कोठेही गडबड गोंधळ नसतो. स्वयंशिस्तीने चालणाऱ्या वारकऱ्यांना आस असते ती केवळ विठुरायाच्या भेटीची ! लाखो वारकरी एकत्रित असूनही त्यांच्यातील शिस्त कधी बिघडत नाही. त्यांची शिस्त समाजाला दिशा देणारीच असते. पालखी मार्गावर पालख्यांचे दर्शन घेण्यासाठी हजारो भाविक उभे असतात. साधू संत येती घरा.... तोचि दिवाळी दसरा..... ! ही भावना त्यामागे असते.

अनेक सेवाभावी संस्था दिंडीतील वारकाऱ्यांसाठी फराळ व आहाराचे वाटप करतात. शासन स्तरावरुन देखील पालख्यांचे योग्य नियोजन केले जाते. पिण्याच्या पाण्याची व मुक्कामाची योग्य सोय केली जाते. वारी दरम्यान गृह विभागाकडून चोख सुरक्षा व्यवस्था पुरवली जाते. आरोग्य विभाग वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी तत्पर असते. तज्ज्ञ डॉक्टरांचे पथक कायम वारकऱ्यांच्या सेवेसाठी उपलब्ध असते. आतातर नेटकरी नेटवरही वारीचे अपडेट देत असतात. फेसबुक, ट्विटर सारख्या सोशल मीडियावर देखील आता वारीचा अमूभव घेता येतो. त्यामुळे वारीदेखील आता ग्लोबल झाली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

**– श्याम ठाणेदार**

## शहरातील वाढती लोकसंख्या आणि पर्यावरणाचा असमतोल !

नुकताच जागतिक लोकसंख्या दिन संपन्न झाला. तुलनात्मक दृष्ट्या आकाराने लहान असूनही भारताने बलाढ्य चीनला मागे टाकून तीन वर्षांपूर्वी लोकसंख्येमध्ये पहिला क्रमांक पटकावला. आर्थिक महासत्ता होऊ पाहणाऱ्या देशांमध्ये भारत सर्वात आघाडीवर आहे, मात्र वाढत्या लोकसंख्येच्या आधारावर जर देश महासत्ता होऊ पाहत असेल तर ती येणाऱ्या संकटाची नांदी आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. यापूर्वी कधीही न अनुभवलेला उकाडा यंदा राज्यासह देशाने अनुभवला. यंदा पाऊस सरासरीपेक्षा कमी पडणार असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

गेल्या काही वर्षांत ऋतुचक्रात होणारी असंतुलितता माणसाच्या आरोग्यावर परिणाम करत आहे. पर्यावरणाचा समतोल ढळतो आहे आणि या सर्वाला कारणीभूत आपणच आहोत. आजमितीला देशात अनियंत्रितपणे वाढणाऱ्या लोकसंख्येवर कोणताच अंकुश नाही. मानवाच्या मूलभूत गरजा पुरवणारे नैसर्गिक स्रोत मर्यादित असल्याने वाढत्या लोकसंख्येचा ताण त्यावर पडत आहे. शहरासारख्या ठिकाणी पाणीपुरवठा करणाऱ्या जलाशयांची संख्या आणि क्षमता मर्यादित आहे. अल्प पावसामुळे ही जलाशये भरली नाहीत तर पाणीकपातीचे संकट ओढवते. यंदा या संकटाचा सामना शहरवासीयांनी केला आहे. शहरातील वाढत्या लोकसंख्येमुळे येणाऱ्या काळात हे संकट अधिक भयावह होणार आहे. रोजगारासाठी लोकांचे लोंढेच्या लोंढे प्रतिदिन शहराकडे धाव घेतात. वाढत्या उद्योगधंद्यासह शहरांतील श्रीमंतांची संख्याही वाढल्याने शहरांत ठिकठिकाणी टोलेजंग इमारती उभ्या राहू लागल्या आहेत. या सर्वांसाठी झाडांची आणि नैसर्गिक संपत्तीची सर्रासपणे



कत्तल केली जात आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे वाहतुकीची साधने अपुरी पडू लागली आहेत. लोकल रेल्वेला पर्याय म्हणून शहरांमध्ये आलेले प्राथमिक टप्प्यातील मेट्रो रेल्वे आणि मोनो रेल्वे हे प्रकल्पही अपुरे पडू लागले आहेत. त्यामुळे आता शहरांत ठिकठिकाणी मेट्रो प्रकल्पाचे जाळे उभारण्याचे काम सुरु झाले आहे. हे मेट्रोमार्ग तयार करण्यासाठी पुन्हा रस्ते खोदले जात आहेत. शहरांतील वाढत्या संख्येच्या तुलनेत रस्त्यांची रुंदी कमी पडू लागल्याने आता ठिकठिकाणी रस्ते रुंदीकरणाची कामेही सुरु करण्यात आली आहेत. शहरांतील ठराविक ठिकाणी होणारी वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी अशा भागांत नवनवीन उड्डाणपुलांची कामेही सुरु झाली आहेत. हे सर्व कमी पडते म्हणून आता सागरी सेतू उभारले जाऊ लागले आहेत. शहरांतील प्रमुख रस्त्यांवर सुरु असलेले मेट्रो प्रकल्प, उड्डाणपुलाची कामे आणि रस्ते रुंदीकरणाची कामे यांमुळे सकाळ आणि संध्याकाळी वाहनांच्या मोठमोठ्या रांगा लागून मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते. या कोंडीत वाहन चालकांकडून अनावश्यक वाजवल्या जाणाऱ्या हॉर्न्समुळे रस्त्याच्या दुतर्फा राहणाऱ्या नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागतो. रस्त्यावरील खोदकामांमुळे उडणारी धूळ, खोदकाम करणाऱ्या यंत्रांचे प्रचंड आवाज आणि गाड्यांचे कर्णकर्कश हॉर्न यांमुळे नागरिकांना जीव मुठीत घेऊन जगावे लागत आहे. ध्वनी आणि वायू या दोन्ही प्रदूषणाचा सामना करावा लागत आहे. याशिवाय शहरांत ठिकठिकाणी सुरु असलेल्या टोलेजंग इमारतींची कामे यांमुळेही प्रदूषणात भर पडत आहे. रस्त्यावरील पुलांची कामे आणि इमारतींची उभारणी यांमध्ये वापरल्या जाणाऱ्या सिमेंट आणि तत्सम रासायनिक पदार्थांमुळे वातावरणातील हवेत विषारी धूलिकण पसरू लागले आहेत ज्यामुळे सर्वच विकसनशील शहरांतील हवेची गुणवत्ता घसरून त्याचा परिणाम मानवाच्या आरोग्यावर होत आहे. दिवाळीच्या दरम्यान दिल्ली, मुंबईसह अनेक शहरांतील हवेची गुणवत्ता कमालीची घसरून वातावरणातील विषारी धूलिकणांचे प्रमाण वाढले होते. त्यावेळी सर्वच ठिकाणचे खोदकाम आणि इमारतीच्या बांधकामांवर बंधने आणली होती. ही सर्व कामे आता पुन्हा सुरु झाली आहेत, त्यामुळे शहरातील नागरिकांना प्रतिदिन श्वासाबरोबर विषारी आणि प्रदूषणकारी हवा ग्रहण करावी लागत आहेत. गर्भवती स्त्रिया, दम्याचे रुग्ण, वयोवृद्ध आणि लहान मुले यांना या प्रदूषित हवेचा अधिक त्रास सहन करावा लागत आहे. श्वसनविकारामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. विकासाच्या नावाखाली पर्यावरणाचा समतोल ढासळतो आहे, तर दुसरीकडे पर्यावरण वाचवण्यासाठी कोणतेही प्रयत्न होताना दिसत नाहीत. पर्यावरणाचे महत्व शाळा महाविद्यालयांत शिकवले जाते; मात्र ते जपण्यासाठी शहरसारख्या ठिकाणी कोणतीही अनुकूलता दिसून येत नाही. लोकसंख्या वाढत जात आहे आणि वाढत्या लोकसंख्येच्या सुविधेसाठी विकासकामे जोर धरू लागली आहेत. या सर्वांमध्ये पर्यावरणाची मात्र अपरिमित होनी होत आहे.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

## सामाजिक तेढ आणि जबाबदार अभिव्यक्ती

आज समाजात धर्माधर्मांमध्ये, जाती-जातींमध्ये आणि विभिन्न समूहांमध्ये विविध कारणांमुळे तेढ निर्माण होत आहेत. समाजमाध्यमांवरून परस्परविरोधी आणि आक्षेपार्ह विधाने केली जात आहेत. यामुळे समाजातील शांतता भंग होऊन विद्वेषपूर्ण वातावरण निर्माण होत आहे. एखाद्या लहानशा घटनेनंतरही समाजात अचानक दुफळी निर्माण होऊन संघर्षाचे प्रसंग उभे राहत आहेत. अशा काळात समाजकंटकांचे विनाकारण फावते आहे.

खरं तर समाजकंटकांना कोणतीही जात किंवा धर्म नसतो. स्वतःमधील उपद्रवी वृत्ती आजमावण्याची खुमखुमी काही लोकांमध्ये असते. त्यांना एखादा विशिष्ट मुद्दा हवा असतो. त्यामुळे हे लोक समाजात विभागणी करणारी कृत्ये करण्यास पुढे येतात.

भारतात लोकशाही शासनव्यवस्था आहे. संविधान हे समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. संविधानातील तत्त्वांचे, मूल्यांचे आणि त्याच्या गाभ्याचे रक्षण करण्याचे काम न्यायालये करत आहेत. अशा काळात समाजामध्ये एखाद्या मुद्द्यावर लोकांमध्ये तीव्र मतभेद असतील, तर संविधान आणि न्यायालय यांच्या भूमिकांना विशेष महत्त्व प्राप्त होते. दंडेलशाही, दडपशाही आणि बहुसंख्यावादाच्या जोरावर आपलेच मत अंतिम सत्य आहे, असे कदापि म्हणता येत नाही.

विचार मांडण्याचे आणि भूमिका घेण्याचे स्वातंत्र्य प्रत्येक नागरिकाला व प्रत्येक समूहाला आहे. मात्र, प्रत्येकाचा मुद्दा कितपत न्यायपूर्ण आहे, हे ठरवण्याचे अंतिम काम संविधान आणि त्या संविधानाचे खरे रक्षण करणारी न्यायालये करतात. स्वतःचे मत लोकांसमोर मांडताना निवडलेले शब्द आणि तिरस्कारपूर्ण आवेश समाजात तेढ निर्माण करू शकतात, हे प्रत्येक व्यक्तीने व्यक्त होण्यापूर्वी लक्षात घेतले पाहिजे.

आपले मत आणि भूमिका ठामपणे, योग्य शब्दांत आणि कोणाच्याही भावना न दुखावता व्यक्त केल्या पाहिजेत. सार्वजनिक व्यासपीठावरून होणारी चिखलफेक हळूहळू समाजमन अधिकाधिक हिंसक आणि अशांत बनवत आहे. काहींना झटपट प्रसिद्धी हवी असते. काहींना प्रत्येक गोष्टीचे राजकारण करून आपले राजकीय भवितव्य घडवायचे असते. तर काहींना तरुणांना भडकावून स्वतःची आक्रमक, लढाऊ प्रतिमा निर्माण करायची असते. एकूणच, सामाजिक तेढ निर्माण होण्यामागे अनेक व्यक्ती विविध हेतू आणि विचार घेऊन काम करत असतात.

लोकशाही व्यवस्था जिवंत ठेवण्यासाठी निकोप चर्चा होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. उलट, उत्तम चर्चा हे परिपक्व लोकशाहीचे ठळक लक्षण आहे. परंतु निकृष्ट, वैयक्तिक टीका-टिप्पणी करणारी, तर्कहीन, खालच्या पातळीवरील आणि हेकेखोर विचारांची चर्चा लोकशाहीला ठिसूळ करू शकते.

म्हणून सामाजिक तेढ निर्माण होणाऱ्या मुद्द्यांवर व्यक्त होण्यापूर्वी अभ्यास, योग्य शब्दांची निवड, तर्कसंगत मांडणी, कारणमीमांसा आणि आकडेवारी यांसारख्या शास्त्रशुद्ध पद्धतींचा वापर करण्याकडे वक्त्यांनी वळले पाहिजे. स्वतःच्या विचारांतून समाजाला दिशा देण्याचा प्रयत्न केला पाहिजे; समाजाची दशा बिघडवण्याचा नव्हे.

सामाजिक तेढ मिटवण्यासाठी सामंजस्यवादी, मध्यममार्गी आणि प्रगल्भ विचार असणारे नेते, सामाजिक कार्यकर्ते, अधिकारी, पत्रकार आणि विचारवंत यांची आज नितांत गरज आहे.

**- किशोर जाधव, सोलापूर**
**- मो. नं. ९९२२८८२५४१**

### बदलली गोष्ट

लाकूड तोड्याची गोष्ट
परत मिळाली कु-हाड
इमानदारीस्तव बक्षीस
खुशीत वसले बि-हाड

उमेद आणली नव्यांनी
अधिक वाढले व-हाड
लाकुडतोड्यांमागेइतर
जंगले पाडे धुडूम् धाड

लहान मोठे ना पाहिले
प्रत्यार्पण करे हर झाड
आणली बडी मशीनरी
जेसिबी रुपात कु-हाड

पुन्हा ना उगवे काहीही
मुळा पासून सारे काढ
मोकळ्याजागीबिल्डर्स
लाभले सोन्याचे घबाड

माणसांना रहाय महाल
होऊ द्या वनराई उजाड
नाईलाज आहे आपला
लोकसंख्येत सतत वाढ

जगली पाहिजे मनुजात
प्राण्यांपक्षांचे नको लाड
कृत्रिम पाऊस पाडू खूप
छळणारच निसर्ग उनाड

**हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक ... अचूक बातमी

## शिक्षक पदाचा मान सन्मान कायम अबाधित राहावा...

एकेकाळी समाजात,गावात आणि जनसामान्यांच्या हृदयात शिक्षकांना खूप मान सन्मान मिळायचा.तेव्हा शिक्षक प्रामाणिकपणे अध्यापन करायचे,शैक्षणिक कामे निष्ठेने करायचे.चारित्र्यवान,नेक,निर्व्यसनी आणि आदर्श शिक्षकांचा सगळा गाव आदर करायचा आणि त्या आदर्श शिक्षकांचे तोंडभरून कौतुक केले जायचे. काळ बदलला,शिक्षण क्षेत्रात प्रचंड बदल झाला.आदर्श शिक्षकांची संख्या कमी होत गेली.शिक्षकी पेशातील निष्ठा कमी झाली.आणि शिक्षणक्षेत्रातील आदर्श व्यक्तिमत्वाच्या साने गुरुजींची संख्या रोडावली. मध्यंतरीच्या काळात शिक्षकांना नाणे गुरुजी म्हणून हिणवले जायचे.आता शिक्षकांचा मान सन्मान म्हणावा तेवढ्या प्रमाणात जपला जात नाही.हे खरे असले तरीही पण एक गोष्ट मात्र नक्की की आजच्या आधुनिक युगात काही शाळांमध्ये साने गुरुजी प्रमाणे निष्ठापूर्वक शैक्षणिक कार्य करणारे आदर्श शिक्षक आजही आहेत.ते शिक्षक साने गुरुजींचा आदर्श वारसा पुढे चालवतात.आमच्या शाळेतही काही शिक्षक खरोखर आदर्श शिक्षक म्हणून शैक्षणिक कार्य करतात याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे.

ज्या शाळेत मागील सलग अठरा वर्षांपासून शिक्षक आणि आता मुख्याध्यापक पदावर मी कार्य करत आहे ती माझी जिल्हा परिषद प्रशाला खंडाळी ही शाळा आहे.लातूर जिल्ह्यातील अहमदपूर तालुक्याच्या आणि परभणी जिल्ह्याच्या सिमेवर वसलेले खंडाळी हे गाव आहे.या गावातील जिल्हा परिषद प्रशाला खंडाळी या शाळेत अध्यापनाचे कार्य करताना आणि शिक्षकी पेशाला प्रामाणिकपणे न्याय देताना एक विलक्षण आनंद मिळतो.या शाळेतील माझ्या शिक्षकी पेशाला जून महिन्यात नुकतेच अठरा वर्षे पूर्ण झाली आहेत.या एकाच शाळेत शिक्षकाची नोकरी करत असताना अनेक सहकारी शिक्षक मित्र, ग्रामस्थ,पालक,शिक्षणप्रेमी नागरिक, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी ,राजकीय व सामाजिक कार्यकर्ते यांचे वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य लाभले आहे.आणि यापुढेही त्या सर्वांचे सहकार्य असेच लाभणार आहे.आमच्या शाळेत अनेक शिक्षक बदली होऊन आले,काही बदली होऊन दुसऱ्या शाळेत गेले. काही शिक्षक नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत .आमच्या शाळेतील जुन्या शिक्षकांपैकी जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार विजेते विनायकराव दराडे,संजय पालकुर्तावार आणि मी स्वतः असे तिघेजण आजही कार्यरत आहोत.बाकीचे आमचे सहकारी शिक्षक शिक्षिका मात्र नवीन आहेत.सध्या आमच्या शाळेतील सर्व शिक्षक बंधू भगिनी प्रामाणिकपणे अध्यापनाचे कार्य करतात.अभिमानाची गोष्ट अशी की आम्ही सगळे शिक्षक निर्व्यसनी आणि वेळेचे पाईक आहोत. आम्ही शिक्षकी पेशाला प्रामाणिकपणे न्याय देण्यासाठी प्रयत्न करत असतो. म्हणून आमच्या शाळेची गुणवत्ता टिकून आहे. आणि विद्यार्थी संख्या इतर शाळांच्या तुलनेत अधिक आहे.या शाळेचे माजी विद्यार्थी विविध क्षेत्रातील उच्च पदावर उल्लेखनीय कार्य करत आहेत.आणि म्हणून शिक्षक या नात्याने आम्हाला आमच्या शाळेचा,आमच्या विद्यार्थ्यांचा,गावकऱ्यांचा आणि सूज्ञ पालकांचा अभिमान वाटतो. आमच्या शाळेतील विद्यार्थीप्रिय शिक्षक भगवानराव केंद्रे यांचा वाढदिवस नुकताच शाळेत साजरा करण्यात आला.ते १० वी वर्गाचे वर्गशिक्षक आहेत. पण इतर वर्गातील विद्यार्थ्यांनी सुद्धा त्यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा केला. सन्माननीय भगवानराव केंद्रे हे आमच्या शाळेत साने गुरूजींच्या रुपात अवतरले असल्याचा भास होतो.ही अतिशयोक्ती नाही वास्तव आहे.त्यांचे शैक्षणिक कार्य व अध्यापन कार्य उल्लेखनीय तर आहेच.त्यांचे चारित्र्य आणि सुहृदयी व्यक्तीमत्व आदर्श ठेवा आहे.ते अतिशय प्रभावीपणे कथा सांगतात आणि विद्यार्थ्यांशी अदबीने व मायेने वागतात. त्यांचा स्वभाव मृदू आणि बोलणे प्रेमळ आहे.अगदी थोड्या कालावधीत त्यांनी विद्यार्थ्यांच्या हृदयात आदर्श शिक्षक म्हणून स्थान मिळविले आहे.म्हणून आम्हाला त्यांच्या शैक्षणिक कार्याचा सार्थ अभिमान आहे. आमच्या शाळेत उत्कृष्ट शैक्षणिक कार्य करून बदली होऊन दुसऱ्या शाळांमध्ये गेलेल्या आणि सेवानिवृत्त झालेल्या अनेक शिक्षकांची आठवण आमचे विद्यार्थी आजही काढतात. शिक्षकांनी प्रामाणिकपणे अध्यापन व शैक्षणिक कार्य केल्याची ही पावती असते.शिक्षकांनी शिक्षकी पेशा चे पावित्र्य जपले,इमानेइतबारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व निष्ठेने अध्यापन केले की त्यांना मान सन्मान मिळतो. कर्तव्यनिष्ठ शिक्षकांचा वाढदिवस विद्यार्थी उत्साहाने साजरा करतात हेच माझे सहकारी शिक्षक मित्र भगवानराव केंद्रे यांनी त्यांच्या कार्याने दाखवून दिले आहे.त्यांच्यामुळे इतर शिक्षकांना उत्कृष्ट कार्य करण्याची प्रेरणा मिळत राहते. शिक्षकांनी त्यांचे शैक्षणिक कार्य व प्रभावी आध्यापन प्रामाणिकपणे केले की शिक्षकांचा मान सन्मान आपोआप वाढतो,विद्यार्थी मनात आदराचे स्थान निर्माण होते.

**- बबन दामोदर गुळवे**
**उमरगा कोर्ट ता.अहमदपूर**
**जि.लातूर मो.९७३०९३९७३२.**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात बातम्या

# आधुनिक युगातील 'द्रोणाचार्य'

### पारंपरिक क्रीडा संस्कृतीचे संवर्धन करणारे सुरेंद्र शिंदे

■ अक्षराज: कृष्णा श्रावणपाटील



**पुणे : भारतीय संस्कृतीत गुरू-शिष्य परंपरेला अतिशय महत्व आहे. महाभारतातील द्रोणाचार्यांनी जसे अर्जुनासह अनेक शिष्यांना धनुर्विद्येत प्रावीण्य मिळवून दिले, तसेच कार्य आजच्या काळात श्री. सुरेंद्र शिंदे सर करत आहेत. पारंपरिक क्रीडा संस्कृतीचे जतन, प्रसार आणि नव्या पिढीमध्ये त्याची आवड निर्माण करण्यांचे त्यांचे कार्य अनन्यसाधारण आहे.**

● **पारंपरिक खेळांचा प्रचार**

मल्लखांब, लाठी-काठी, तलवारबाजी, दोरीखेच यांसारख्या पारंपरिक खेळांद्वारे शारीरिक व मानसिक विकास होतो, असा विश्वास शिंदे सरांचा आहे. त्यांनी शाळा, महाविद्यालये आणि विविध क्रीडा स्पर्धांमधून या खेळांना व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे.

● **युवकांसाठी प्रेरणादायी मार्गदर्शन**

आजची तरूणाई मोबाईल आणि डिजिटल जगात गुंतत चालली आहे. अशा वेळी शिंदे सर तरूणांना प्रत्यक्ष मैदानावर आणून त्यांच्यात शिस्त, चिकाटी, आत्मविश्वास आणि देशभक्तींची भावना रूजवित आहेत.

● **अनेक पुरस्कारांनी सन्मानित**

त्यांच्या या कार्याची दखल घेऊन विविध सामाजिक आणि क्रीडा संस्थांनी त्यांना अनेक पुरस्कारांनी गौरविले आहे. मात्र, त्यांच्या मते, खरा पुरस्कार म्हणजो विद्यार्थ्यांचे यश आणि खेळांबद्दलची त्यांची निष्ठा.

> "खेळ हे केवळ स्पर्धसाठी नसतात, तर ते जीवन घडवतात. पारंपरिक खेळांमधून आपली संस्कृती, शिस्त आणि संस्कार जपले जातात. – सुरेंद्र शिंदे

# पुट्टपर्थीत 'अम्मा का टिफिन ' ची दखल; श्री सत्यसाई संस्थेकडून कौतुक



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.११, चंद्रपूर :** आंध्र प्रदेशातील अनंतपूर जिल्ह्यातील पवित्र पुट्टपर्थी येथे आमदार किशोर जोरगेवार यांनी श्री सत्यसाई परिवाराचे सदस्य तथा श्री सत्यसाई सेवा संस्थेचे प्रमुख रत्नाकर यांची सदिच्छा भेट घेतली. या भेटीदरम्यान त्यांनी आपल्या वतीने यशस्वीपणे राबविण्यात येत असलेल्या अम्मा का टिफिन या समाजोपयोगी उपक्रमाची सविस्तर माहिती दिली. निराधार, गरजू, रुग्णांचे नातेवाईक तसेच उपाशीपोटी राहणाऱ्या नागरिकांपर्यंत सन्मानाने व प्रेमाने मोफत अन्न पोहोचविण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या अम्मा का टिफिन उपक्रमाची संकल्पना रत्नाकर यांना अत्यंत भावली. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत सेवा पोहोचविण्याचा हा उपक्रम प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी जगभरातील सुमारे १६० देशांमध्ये विविध सेवाभावी उपक्रम राबविणाऱ्या श्री सत्यसाई सेवा संस्थेच्या कार्यामध्ये अम्मा का टिफिन या संकल्पनेचा समावेश करण्याबाबत त्यांनी सकारात्मक भूमिका व्यक्त केली.

अन्नदान, वस्त्रदान, आरोग्यसेवा, औषधोपचार आणि विविध मानवतावादी उपक्रम राबविणाऱ्या श्री सत्यसाई सेवा संस्थेकडून अम्मा का टिफिन उपक्रमाला मिळालेला आशीर्वाद हा या सामाजिक उपक्रमासाठी मोठा सन्मान असल्याची भावना आमदार किशोर जोरगेवार यांनी व्यक्त केली. या सहकार्यामुळे अधिकाधिक गरजूंना प्रेम, सेवा आणि माणुसकीच्या भावनेतून अन्न उपलब्ध करून देण्याच्या कार्याला नवी गती मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. सेवा हीच खरी साधना या विचारातून समाजातील शेवटच्या घटकापर्यंत मदतीचा हात पोहोचविण्याचा आपला संकल्प अधिक दृढ झाल्याचे आमदार जोरगेवार यांनी सांगितले.

# बोरीत मध्यरात्री चार दुकानांवर धाडसी चोरी; दोन तास वीज गायब, प्रशासन झोपेत?

**अक्षराज : रहीम कोक्कर**




**दि.१२, जिंतूर :** तालुक्यातील प्रमुख आणि मोठी बाजारपेठ म्हणून ओळख असलेल्या बोरी शहरात मध्यरात्री चार दुकानांवर चोरट्यांनी धाडसी चोरी केल्याने व्यापारी वर्गात भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे, चोरीच्या वेळेस तब्बल दोन तास वीजपुरवठा खंडित असल्याची माहिती समोर येत असून, यामुळे सुरक्षेच्या व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. व्यापाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, वीज नसल्यामुळे परिसर अंधारात बुडाला होता. त्यामुळे चोरट्यांना चोरी करणे अधिक सोपे झाले. त्यामुळे त्या वेळेस वीजपुरवठा का बंद होता, याची चौकशी होणे आवश्यक असल्याची मागणी होत आहे. बोरी ही जिंतूर तालुक्यातील मोठी व्यापारी बाजारपेठ असून, दररोज हजारो नागरिक खरेदीसाठी येथे येतात. अशा महत्त्वाच्या ठिकाणी सुरक्षेचा अभाव आणि वीजपुरवठ्यातील अडचणीमुळे व्यापारी वर्ग चिंतेत आहे.

व्यापाऱ्यांनी पोलिस प्रशासनाने चोरीचा तपास जलदगतीने करावा, सीसीटीव्ही फुटेज तपासावे, रात्रीची गस्त वाढवावी तसेच महावितरणने त्या रात्री वीजपुरवठा खंडित होण्यामागील कारण स्पष्ट करावे, अशी मागणी केली आहे.

सध्या या घटनेमुळे व्यापारी आणि नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून, चोरीचे नेमके कारण आणि वीजपुरवठा खंडित होण्यामागील कारण तपासातूनच स्पष्ट होईल. त्यामुळे पोलिस आणि संबंधित विभागाने निष्पक्ष व सखोल चौकशी करून सत्य समोर आणावे, अशी जोरदार मागणी होत आहे.

# भानेगाव उड्डाणपुलावर मद्यधुंद कारचालकाने दुचाकीला दिली धडक

● **आरोग्य कर्मचारी गंभीर जखमी...**

● **'पोलीस' लिहिलेल्या कारमधील आरोपींना वाचवण्याचा खापरखेडा पोलिसांचा प्रयत्न?**

**अक्षराज : दिवाकर घेर**




**दि.१२, नागपूर :** खापरखेडा पोलीस स्टेशन हद्दीतील नवीन बिना भानेगाव उड्डाणपुलावर १२ जुलै रविवारला दुपारच्या सुमारास झालेल्या अपघातात एका मद्यधुंद कारचालकाने दुचाकीला जोरदार धडक दिली यात दुचाकी चालक संदीप ढूमणे गंभीर जखमी झाला असून त्यांच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तो चिचोली प्राथमिक आरोग्य केंद्रात मलेरिया वर्कर म्हणून कार्यरत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, संदीप ढूमणे हे त्यांच्या हिरो होंडा स्प्लेंडर दुचाकी क्रमांक एमएच-४०-एव्ही-८५०२ ने खापरखेडावरून भानेगावकडे जात होते यादरम्यान भानेगाव उड्डाणपुलावरून एक पांढऱ्या रंगाची कार क्रमांक एमएच-४९-बीआर-८७२५ भरधाव वेगाने खापरखेडाच्या दिशेने जात होती. कारमधील चार ते पाच जण दारूच्या नशेत धुंद होते. यावेळी मद्यधुंद कारचालकाने ढूमणे यांच्या दुचाकीला समोरून जोरदार धडक दिली. सदर धडकेत संदीप ढूमणे गंभीर जखमी झाले. अपघातानंतर उड्डाणपुलावर नागरिकांची गर्दी जमली. लोकांचा वाढता रोष पाहून कारचालकाने जखमी ढूमणे यांना खाजगी रुग्णालयात दाखल केले. मात्र, पोलीस येईपर्यंत कारमधील एका व्यक्तीला नागरिकांनी घटनास्थळीच रोखून धरले होते.

अपघाताची माहिती मिळताच एका जागरूक पत्रकाराने तत्परता दाखवत ११२ क्रमांकावर फोन करून पोलिसांना पाचारण केले. माहिती मिळताच खापरखेडा पोलीस ठाण्याचे पोलीस पोहा बक्कल नंबर १२०४ सचिन दखने घटनास्थळी दाखल झाले. नियमानुसार पोलिसांनी अपघातग्रस्त कार आणि आरोपींना ताब्यात घेणे अपेक्षित होते.मात्र खापरखेडा पोलिस ठाण्यातील कर्तव्यदक्ष पोलीस हवालदाराने पत्रकारालाच 'तुम्ही मधात पडू नका, ते चांगले लोक नाहीत' असे म्हणत हुज्जत घालून दमदाटी दिली. पोलिसांच्या भूमिकेमुळे खापरखेडा पोलीस घटनेतील आरोपीना पाठीशी घालत आहेत का? असा संशय बळावला आहे.

सदर प्रकरणात धक्कादायक बाब म्हणजे कारवर (POLICE) नावाचे स्टिकर लिहिले होते. मात्र सदर कार पोलीस खात्यातील नसल्याचे प्रथम दर्शनी आढळून येते त्यामूळे कारवर 'झजडखउए' चे स्टिकर लावण्यामागचा हेतू काय होता? याची निष्पक्ष चौकशी होणे गरजेचे आहे.

बातमी लिहिपर्यंत यासंदर्भात खापरखेडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल झाली नव्हती. मात्र मद्यधुंद कारचालकावर आणि पत्रकाराला धमकावणाऱ्या संबंधित पोलीस कर्मचाऱ्यावर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी नागरिकांमधून जोर धरत आहे.

# 'एनएमएमटी'च्या ताफ्यात दीडशे सीएनजी बसचे लोकार्पण

**अक्षराज : अमोल सूर्यवंशी**

**दि.१२, खारघर (नवी मुंबई) :** नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या अर्थात एनएम एमटी बस सेवेच्या ताब्यात नव्याने समाविष्ट होत असलेल्या १५० सीएनजी बसचे लोकार्पण महाराष्ट्र राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या शुभहस्ते महापौर सुजाता पाटील व उपमहापौर दशरथ भगत यांच्या प्रमुख उपस्थितीत घनसोली आगारात संपन्न झाले. याप्रसंगी स्थायी समितीचे सभापती अशोक पाटील परिवहन समितीचे सभापती विकास झंजाड आरोग्य समूह समितीचे सभापती डॉक्टर जयाजीनाथ पाणीपुरवठा समितीचे सभापती रविकांत पाटील प्रभाग समितीच्या अध्यक्ष ललिता मढवी आणि इतर नगरसेवक परिवहन समिती सदस्य आणि अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी वन मंत्री गणेश नाईक यांनी नव्या सीएनजी बसेसच्या माध्यमातून प्रवाशांना अधिक सुरक्षित आरामदायी व पर्यावरण पूरक प्रवास सुविधा उपलब्ध होणार असून सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचे गुणवत्ता आणि कार्यक्षमता वाढवण्यास मदत होणार असल्याबद्दल समाधान व्यक्त केले यामुळे इंधन खर्चात बचत होऊन पर्यावरण संवर्धनाला ही हातभार लागणार आहे याचाही विशेष उल्लेख त्यांनी केला पर्यावरण पूरक आधुनिक व प्रवासी सुविधांनी सुसज्ज अशा सीएनजी बसेसचा समावेश एन एम टी च्या ताफ्यात झाल्यामुळे परिवहन उपक्रमामार्फत पुरवण्यात येणाऱ्या प्रवासी सेवेत मोठी भर पडणार आहे.




सध्या नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या ताफ्यात एकूण ४१६ बसेस कार्यरत आहेत उपक्रमाच्या ताफ्यात नव्याने एकूण १५० सीएनजी बसेस समाविष्ट करण्यात आले असून नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील यांनी नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील ४०० महिलांना नवी मुंबई महानगरपालिका समाज विकास विभागामार्फत बस चालक प्रशिक्षण देण्याची कार्यवाही सुरू असल्याचे सांगितले.

तसेच परिवहन समितीचे सभापती विकास झंजाड यांनी परिवहन उपक्रमाच्या प्रगतीसाठी व उपक्रम स्वयंपूर्ण होण्यासाठी घेतल्या जात असलेल्या विविध निर्णय यांची माहिती देत परिवहनच्या वाहक चालक व कर्मचाऱ्यांच्या हिताचे अनेक निर्णय घेतले असल्याचे सांगितले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी व नागरिकांनी परिवहन उपक्रमाच्या कार्याचे कौतुक करून भविष्यातही अधिक गुणवत्ता पूर्ण व सुरक्षित प्रवास सेवा उपलब्ध करून देण्याच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी सर्व परिवहन समिती सदस्य तसेच परिवहन व्यवस्थापक उमाकांत जंगले मुख्य लेखा व वित्त अधिकारी तुषार दौंडकर कार्यकारी अभियंता विवेक अचलकर तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# पंढरपुरात ४ हजार सायकलस्वारांची दिंडी ; क्रीडा प्राधिकरणाचे चाटे यांच्या हस्ते शुभारंभ

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.१२, पंढरपूर :** आषाढी एकादशी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र आणि कर्नाटकातील सुमारे चार हजार सायकलस्वारांची भव्य सायकल दिंडी शनिवारी पंढरपुरात दाखल झाली. भारतीय क्रीडा प्राधिकरणाचे संचालक पांडुरंग चाटे यांच्या हस्ते या सायकल दिंडीचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी आषाढी पंढरपूर सायकलवारी असोसिएशनचे अध्यक्ष उमेश परिचारक यांनीही दिंडीत सहभाग घेतला.

आषाढी शुद्ध एकादशीचा सोहळा २५ जुलै २०२६ रोजी होणार असून, विविध पालखी सोहळ्यांसह राज्यभरातून वारकरी पंढरपूरकडे येत आहेत. त्याच पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या या सायकल संमेलनात सहभागी सायकलस्वारांनी



वारकरी परंपरेप्रमाणे सायकलवरून नगरप्रदक्षिणा करून अनोखा संदेश दिला. 'फिट इंडिया' या राष्ट्रीय अभियानांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचा उद्देश सायकलिंगसारख्या व्यायामाचे महत्त्व जनसामान्यांपर्यंत पोहोचविणे आणि आरोग्यदायी जीवनशैलीबाबत जागरूकता निर्माण करणे हा होता. सायकलिंग हा आरोग्यदायी, पर्यावरणपूरक आणि किफायतशीर वाहतुकीचा पर्याय असून नियमित सायकल वापरामुळे शारीरिक तंदुरुस्ती राखण्यास मोठी मदत होते, असा संदेश यावेळी देण्यात आला.

राज्याच्या कानाकोपऱ्यासह कर्नाटकातून आलेल्या हजारो सायकलस्वारांच्या उपस्थितीमुळे पंढरी नगरीत आध्यात्मिक आणि उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले होते.

यावेळी पंढरपूरचे तहसीलदार सचिन लंगुटे, मुख्याधिकारी महेश रोकडे, सेवानिवृत्त आयपीएस अधिकारी हरीष बैजल यांच्यासह पंढरपूर सायकल्स क्लब, नाशिक सायकल क्लब आणि बारामती सायकल क्लबच्या पदाधिकारी व सदस्यांनी कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन केले.

# ९८४ महिला बचत गटांना २१.३२ कोटींचे कर्ज वाटप

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१२, सावली (चंद्रपूर) :** ग्रामीण भागातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करुन त्यांना स्वावलंबनाकडे नेण्याच्या उद्देशाने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने एक महत्वपूर्ण उपक्रम राबवित तालुक्यातील ९८४ महिला बचत गटांना तब्बल २१.३२ कोटी रुपयांचे विक्रमी कर्ज वितरित केले आहे. या उपक्रमामुळे शेकडो महिला बचत गटांना उद्योग, व्यवसाय आणि रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होणार आहेत. महिला बचत गट हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचे मजबूत आधारस्तंभ मानले जातात. नियमित बचत, आर्थिक शिस्त आणि परस्पर सहकार्याच्या माध्यमातून हे गट अनेक कुटुंबाच्या आर्थिक उन्नतीचे साधन ठरत आहेत. या बचत गटांना वेळेवर आणि पुरेशा प्रमाणात कर्ज उपलब्ध झाल्यैस महिलांना स्वत:चा उद्योग उभारणे, व्यवसायाचा विस्तार करणे आणि कुटुंबाचे आर्थिक उत्पन्न वाढविण्यासाठी मदत होते. या माध्यमातून महिलांना लघुउद्योग, गृहउद्योग, शिवणकाम, मसाला व पापड निर्मिती, दुग्धव्यवस, शेळीपालन, कुक्कुटपालन अशा विविध उपक्रमामुळे ग्रामीण भागातील महिलांच्या हाताला रोजगार मिळत असते. तालुक्यातील सावली, व्याहाड खुर्द, पाथरी, अंतरगाव, लोंढोली, कापसी व विहीरगाव अशा ७ शाखेतून हे



कर्ज महिला बचतगटांना वितरित करण्यात आले. रवींद्र शिंदे, संजय डोंगरे, आवेश पठाण यांच्या मार्गदर्शनात संचालक रोहित बोम्मावार यांच्या पुढाकारातून महिला बचत गटांना विक्रमी कर्ज वितरित करण्यात आले.

# ॲक्युपंक्चर उपचार शिक्षणाच्या विस्तारासाठी राज्य शासन प्रयत्नशील - मुख्यमंत्री फडणवीस

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१२, मुंबई :** ॲक्युपंक्चर उपचार पद्धतीतून असंख्य रूग्णांना आपल्या व्याधीपासून मुक्त होण्यास मदत झाली आहे. तेवीस-चोवीस वर्षांपूर्वी मी स्वतः पाठदुखीने त्रस्त असताना या उपचार पद्धतीने मला तंदुरुस्त होता आले. या ज्ञानशाखेच्या विस्तारासाठी व याचे शैक्षणिक मार्ग वृद्धींगत व्हावेत, या दृष्टीने राज्य शासन प्रयत्नशील असून शासकीय पातळीवर कोठेही कमतरता पडणार नाही, अशी निःसंदिग्ध ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय कन्व्हेंन्शन सेंटर येथे आयोजित नॅशनल कॉन्फरन्स ऑन ॲक्युपंक्चर ॲक्यूकॉन २०२६ च्या उद्घाटन प्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी महाराष्ट्र काऊन्सील ऑफ ॲक्युपंक्चरचे डॉ.रूमी बेरामजी, इंडियन सोसायटी ऑफ मेडिकल अक्युपंक्चर या संस्थेचे अध्यक्ष डॉ. रमण



कपूर यांच्यासह डॉ.नारायण नवले आणि डॉ. प्रदीप गुहा आदि मान्यवर उपस्थित होते.

सिईंग इज बिलिव्हींग अर्थात आपण प्रत्यक्ष जे डोळ्याने पाहतो, त्यावर विश्वास दृढ करतो. ॲक्युपंक्चर उपचार पद्धती ही अशीच अनुभूतीची उपचार पद्धती आहे. या सर्वसमावेशक उपचार पद्धती अंतर्गत आपण ही उपचार पद्धती महत्त्वाची मानली आहे. या क्षेत्रापुढे असलेल्या अडचणींची जाणीव असून शासनाच्या वतीने पूर्ण क्षमतेने या अडचणी दूर करण्याचा प्रयत्न करू, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या ज्ञानशाखेला, उपचार पद्धतीला प्रतिष्ठा व शैक्षणिक मान्यता देण्यात दिलेले योगदान खूप महत्त्वपूर्ण आहे. वेळोवेळी त्यांनी आमची भूमिका समजून घेत शासनस्तरावर असलेल्या अडचणी दूर केल्या असून त्यांच्या सहकार्यानेच महाराष्ट्रात ४ हजार ५०० पेक्षा अधिक नोंदणीकृत तज्ज्ञ अक्युप्रेशरची सेवा देत आहेत. यात साठ टक्के संख्या ही महिलांची असल्याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे, असे डॉ.रूमी बेरामजी यांनी यावेळी सांगितले. डॉ.रमन कपूर यांनी ही मनोगतात शासनाच्या योगदानाला अधोरेखित केले.

# संकल्प संस्था आयोजित पॅरा कौन्सिलिंग कोर्स अंतर्गत महाराष्ट्र नशाबंदी मंडळ येथे शैक्षणिक भेट संपन्न

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१२, मुंबई :** समाजामध्ये संवेदनशील, जबाबदार आणि सक्षम पॅरा समुपदेशक घडविण्याच्या उद्देशाने संकल्प संस्थेमार्फत आयोजित पॅरा कौन्सिलिंग कोर्स अंतर्गत दिनांक ११ जुलै २०२६ रोजी महाराष्ट्र नशाबंदी मंडळ, ओल्ड कस्टम हाऊस, मुंबई येथे प्रशिक्षणार्थ्यांसाठी शैक्षणिक भेट आयोजित करण्यात आली. ही शैक्षणिक भेट संकल्प संस्थेचे संस्थापक व अध्यक्ष विनोद हिवाळे यांच्या नेतृत्वाखाली तसेच महाराष्ट्र नशाबंदी मंडळाच्या सचिव वर्षाताई विद्या विलास यांच्या विशेष सहकार्याने संपन्न झाली. कार्यक्रमाचे नियोजन व समन्वय सविता हेंडवे, दीपा गमरे आणि वनिता सावंत यांनी उत्कृष्टरीत्या पार पाडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चेतना सावंत यांनी प्रभावीपणे केले. प्रारंभी उपस्थितांचे स्वागत करून शैक्षणिक भेटीचा उद्देश स्पष्ट करण्यात आला. प्रमुख व्याख्याते समुपदेशक मनीषा बागुल यांनी समुपदेशनाची भूमिका : व्यसन प्रतिबंध, हस्तक्षेप व पुनर्वसन या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी समुपदेशन ही केवळ सल्ला देण्याची प्रक्रिया नसून व्यक्तीला स्वतःमध्ये सकारात्मक बदल घडविण्यास सक्षम करणारी वैज्ञानिक प्रक्रिया असल्याचे सांगितले. व्यसन प्रतिबंधातील समुपदेशकाची भूमिका, प्राथमिक, दुय्यम व तृतीय स्तरावरील प्रतिबंध, समुपदेशनाची टप्प्याटप्प्याने राबवली जाणारी प्रक्रिया, विश्वासाचे नाते निर्माण करणे, प्रभावी संवाद, सक्रिय ऐकणे, सहानुभूती, गोपनीयता, व्यावसायिक नैतिकता, कुटुंबाची भूमिका, पुनर्वसन आणि पुनर्व्यसन टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना याविषयी त्यांनी उदाहरणांसह मार्गदर्शन केले. प्रशिक्षणार्थ्यांसमोर सादर करण्यात आलेल्या केस स्टडीमुळे प्रत्यक्ष समुपदेशन प्रक्रियेची समज अधिक स्पष्ट झाली.

बास्को डिसोजा यांनी मद्य, तंबाखू, अमली पदार्थ, औषधांचे गैरवापर तसेच इतर विविध प्रकारच्या व्यसनांविषयी माहिती देत त्यांच्या शारीरिक, मानसिक, कौटुंबिक व सामाजिक परिणामांवर प्रकाश टाकला. व्यसनमुक्त समाज निर्माण करण्यासाठी जनजागृती, समुपदेशन, कुटुंबाचा सहभाग आणि समाजातील प्रत्येक घटकाची भूमिका किती महत्त्वाची आहे, यावर त्यांनी विशेष भर दिला.



शैक्षणिक भेटीदरम्यान प्रशिक्षणार्थ्यांनी महाराष्ट्र नशाबंदी मंडळाच्या कार्यपद्धतीची माहिती घेतली. व्यसनमुक्ती अभियान, समुपदेशन सेवा, पुनर्वसन प्रक्रिया तसेच समाजामध्ये व्यसन प्रतिबंधासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची सविस्तर माहिती मिळाल्यामुळे प्रशिक्षणार्थ्यांच्या ज्ञानात मोलाची भर पडली. या कार्यक्रमासाठी रुपेश गोरे, सूर्यकांत चव्हाण, रेणुका सिंग, अश्विनी गमरे आणि सुप्रभा गायकवाड यांचे विशेष सहकार्य लाभले. संकल्प संस्थेमार्फत आयोजित पॅरा कौन्सिलिंग कोर्समध्ये सैद्धांतिक ज्ञानाबरोबरच प्रत्यक्ष क्षेत्रभेटी, तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि अनुभवाधारित शिक्षणाला विशेष प्राधान्य देण्यात येत असून अशा शैक्षणिक भेटींच्या माध्यमातून सक्षम, संवेदनशील आणि समाजाभिमुख पॅरा समुपदेशक तयार करण्याचा संस्थेचा प्रयत्न असल्याचे संकल्प संस्थेचे अध्यक्ष विनोद हिवाळे यांनी सांगितले.

# बनावट ‘वरिष्ठ पोलीस अधिकारी’ बनून लाखोंची फसवणूक; गुन्हे शाखेची कारवाई, तीन गुन्ह्यांचा उलगडा



**अक्षराज : सुनिल साखरकर**

**दि.१२, मुंबई :** स्वतः ला वरिष्ठ पोलीस अधिकारी असल्याचे भासवत बनावट शासकीय ओळखपत्रे, ‘पोलीस’ अशी पाटी लावलेली कार आणि सरकारी अधिकाऱ्याचा रुबाब वापरून नागरिकांची लाखो रुपयांची फसवणूक करणाऱ्या टोळीचा मुंबई गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. या कारवाईत मुख्य आरोपी मोहम्मद गौस इब्राहिम खतीब उर्फ डॉ. राज खतीब (वय ५२) याच्यासह राजेश बडे सिंह चौधरी (वय ४६) आणि अन्य एका आरोपीला अटक करण्यात आली असून, फरार आरोपींचा शोध सुरू आहे.

तपासादरम्यान या टोळीने केलेल्या फसवणुकीचे आणखी दोन गुन्हे उघडकीस आले आहेत. गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या कक्ष-१ कडे २६ जून २०२६ रोजी प्राप्त झालेल्या तक्रारीनुसार आरोपी, स्वतःला वरिष्ठ पोलीस अधिकारी असल्याचे सांगून नागरिकांचा विश्वास संपादन करत होते. बनावट शासकीय ओळखपत्रे आणि ‘पोलीस’ अशी पाटी असलेल्या वाहनाचा वापर करून बँक कर्ज मंजूर करून देण्याचे आमिष दाखवत ते पैशांची उधळपट्टी करत असल्याचे निष्पन्न झाले. याप्रकरणी गुन्हा दाखल करून तिघांना अटक करण्यात आली.

या तपासादरम्यान आणखी एका ३५ वर्षीय तक्रारदाराने गुन्हे शाखेकडे धाव घेतली. आरोपी मोहम्मद गौस इब्राहिम खतीब उर्फ डॉ. राज खतीब, राजेश बडे सिंह चौधरी आणि त्यांच्या दोन साथीदारांनी स्वतःला शासकीय विभागातील अधिकारी असल्याचे भासवत बिल्डरकडे अडकलेली रक्कम व्याजासह परत मिळवून देण्याचे अथवा संबंधित प्रकल्पात फ्लॅट मिळवून देण्याचे आमिष दाखवले. त्यासाठी रोख रक्कम, विविध बँक खात्यांद्वारे पैसे तसेच ॲपल कंपनीचा मोबाईल स्वीकारून एकूण १५ लाख ९० हजार ५३२ रुपयांची फसवणूक केल्याचे तपासात समोर आले. या गुन्ह्यातील आरोपी राजेश बडे सिंह चौधरी याला जयपूर (राजस्थान) येथून ताब्यात घेऊन अटक करण्यात आली. सदर आरोपी विरुद्ध गु.प्र.शा., गु.र.क्र. ७६/२०२६ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास कक्ष -१ मार्फत करण्यात येत आहे.

याच दरम्यान पहिल्या गुन्ह्याची बातमी सोशल मीडियावर पाहिल्यानंतर आणखी एक ४० वर्षीय तक्रारदार, गुन्हे शाखेकडे आला. त्याच्या तक्रारीनुसार, १)मोहम्मद गौस इब्राहिम खतीब उर्फ राज खतीब(वय ५४), २)मसहब मोहम्मदगौस खतीब (वय ३०) आणि अन्य एका साथीदाराने वरिष्ठ पोलीस अधिकारी असल्याचे भासवत तक्रारदाराच्या ओळखीतील तीन तरुणांना पोलीस दलात नोकरी मिळवून देण्याचे आश्वासन दिले. त्यासाठी १२ लाख रुपये स्वीकारून त्यांची फसवणूक करण्यात आल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यांचे तक्रारीवरून गु.प्र.शा., गु.र.क्र. ७८/२०२६ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे या प्रकरणाचा पुढील तपास गुन्हे शाखेच्या कक्ष-३ कडून सुरू आहे. ही कारवाई बृहन्मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती, पोलीस सहआयुक्त (गुन्हे) अनिल कुंभारे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) कृष्णकांत उपाध्याय, पोलीस उपआयुक्त (प्रकटीकरण) राज तिलक रौशन, सहाय्यक पोलीस आयुक्त, (डी -दक्षिण) दिनकर शिलवटे, सहाय्यक पोलीस आयुक्त (डी -मध्य) सदानंद राणे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष -१ येथील वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद पाटील, प्रभारी पोलीस निरीक्षक गणेश पिसाळ (कक्ष -३)सहाय्यक पोलीस निरीक्षक सिद्धेश जोष्टे (कक्ष -३), देवीदास लाब्दे ( कक्ष -१), महेश सांगळे (कक्ष -१), सचिन बाराते (कक्ष -५),

पोलीस उपनिरीक्षक खैरावकर (कक्ष -३),तसेच सहाय्यक फौजदार प्रकाश माने (कक्ष-१), पो.ह. गिरकर(कक्ष -३), पो. शि. घाडी(कक्ष १), केळकर(कक्ष -१) आणि जाधव(कक्ष -१)यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. या टोळीच्या फसवणुकीचा आवाका अधिक मोठा असण्याची शक्यता असून, फरार आरोपींचा शोध आणि आर्थिक व्यवहारांचा तपास सुरू असल्याची माहिती गुन्हे शाखेने दिली.

# स.स.जनार्दन महाराज वसंतगडकर पालखी सोहळा दत्त मंदिरात विसावला

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१२, चरेगाव (सातारा) :** स स जनार्दन महाराज वसंतगडकर हे एक प्रसिद्ध कीर्तनकार व संत होते. ते वसंतगड संस्थानचे मठाधिपती होते.महाराष्ट्रात कीर्तन आणि प्रवचनांच्या माध्यमातून त्यांनी समाजप्रबोधनाचे कार्य केले. लोकांना अध्यात्मिक ज्ञान दिले. वसंतगड संस्थान हे एक धार्मिक आणि सामाजिक केंद्र आहे.जिथे स स जनार्दन महाराजांनी अनेक वर्ष सेवा केली.सध्या त्यांच्या कार्याचा वारसा त्यांचे शिष्य संतचरणरज बाळकृष्ण दादा वसंतगडकर समर्थपणे पुढे नेत आहेत. तेही कीर्तन आणि प्रवचनांच्या माध्यमातून समाजप्रबोधन करत आहेत. वसंतगड संस्थान दरवर्षी पंढरपूरला पालखी सोहळा काढते,ज्यामध्ये संतचरणरज बाळकृष्ण दादा वसंतगडकर मार्गदर्शन करतात. हा दिंडीसोहळा मोठ्या उत्साहात साजरा होतो. त्या पार्श्वभूमीवर सालाबादप्रमाणे वसंतगड संस्थानने काढलेल्या पंढरपूर दिंडी सोहळ्याचे शुक्रवार दिनांक १० जुलै रोजी प्रमोद पाटील तसेच रमेश पाटील या पाटील बंधूंच्या योगदानातून पाटण पंढरपूर राज्य मार्गालगत साकारलेल्या दत्त मंदिरात सायंकाळी सहा वाजता आगमन झाले. यावेळी उंब्रज परिसरातील वारकरी सांप्रदायात कार्यरत असलेल्या व्यक्तींनी दिंडी सोहळ्याचे मोठ्या उत्साहात स्वागत केले. यावेळी उंब्रज येथील चौबुर्जी परिवार,विठ्ठल भक्त,मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.दरम्यान, ठीक सायंकाळी सहा वाजता पालखीचे आगमन झाल्यानंतर आरती,नामस्मरण,चिंतन, ध्यानधारणा करण्यात आली. त्यानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम पार पडला. विणेकरी भानुदास आटोळे यांनी अन्नदानासाठी योगदान दिले.रात्री मुक्काम करून पहाटेचे स्नान,काकड आरती झाल्यानंतर मोठ्या भक्तिमय वातावरणात दिंडी सोहळा सकाळी ठीक सात वाजता पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ झाला. दत्त मंदिर कार्य कमिटीचे उपाध्यक्ष रमेश पाटील तसेच संचालक मंडळ यांनी पालखी सोहळ्याची अतिशय उत्कृष्ट पद्धतीने व्यवस्था केली होती.उंब्रज येथील समस्त चौबुर्जी परिवार तसेच परिसरातील वारकरी संप्रदायाचे या पालखी सोहळ्यासाठी विशेष सहकार्य लाभले. दरम्यान, उपस्थित भाविकांनी आम्हाला जरी पंढरीला यायला मिळालं नाही तरी आमचा पांडुरंगाला नमस्कार सांगा अशी भावनिक साद घातल्यामुळे पालखी सोहळ्याचे वातावरण अधिकच भावनिक बनले होते.

## थोडक्यात बातम्या

# कोशिश फांऊडेशन तर्फे खापरखेडा येथे निशुल्क आयुर्वेदिक रोग निदान शिबिर संपन्न

**अक्षराज : दिवाकर घेर**



**दि.१२, नागपूर :** ‘आयुर्वेद प्रत्येक घरापर्यंत पोहोचवणे’ हा उद्देश पुढे ठेवून कोशिश फाउंडेशन आणि नागपूर येथील आरोग्यधाम हेल्थकेअर सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ.ममतानी दांपत्य विविध ठिकाणी आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करीत असतात. याच अनुषंगाने खापरखेडा येथील कोशिश फाऊडेशनचे संयोजक कपिल वानखेडे आणि सह-संयोजक रितेश जैन यांच्यातर्फे २९९ वे आयुर्वेदिक निशुल्क रोग निदान शिबिर नुकतेच खापरखेडा येथील जैन स्थानक भवनात आयोजित करण्यात आले. शिबिरात आलेल्या रुग्णांवर डॉ.एम.ममतानी आणि डॉ. अंजू ममतानी यांनी विविध आजाराच्या १०५ रुग्णाची तपासणी करून निशुल्क औषधी वाटप करण्यात आली तसेच रुग्णांना विविध आजारांवर मोफत आयुर्वेदिक पंचकर्म वैद्यकीय सल्ला देण्यात आला. शिबिराचे उद्घाटन सामाजिक कार्यकर्ते रमेश जैन यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी चिंचोली (खापरखेडा) ग्रामपंचायतच सरपंच सरपंच मीनाक्षी तागडे, वलनी विभागाचे माजी जिल्हा परिषद सदस्य प्रकाश खापरे, सावनेर पंचायत समितीचे माजी सभापती चंद्रशेखर पानतावणे, दिवाकर घेर, अशोक वंजाल, सुनील येरपुडे, रोहित बोरीकर,कोशिश फाऊडेशनचे संयोजक कपिल वानखेडे आणि सह-संयोजक रितेश जैन, दिक्षम डोंगरे, विलास महल्ले , गिरधारी शर्मा, केशव पानतावणे,विक्की थापा आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.

# निर्भीड पत्रकार पुरस्काराने समाजसेवक, पत्रकार चंद्रकांत सुतार यांचा गौरव

**अक्षराज : प्रतिनिधी**



**दि.१२, माथेरान :** समाजकारण, जनसेवा आणि सामाजिक बांधिलकी जपत सातत्याने कार्य करणारे समाजसेवक तथा पत्रकार चंद्रकांत सुतार यांना आर्यारवी एंटरटेनमेंट आयोजित प्रतिष्ठेचा ’निर्भीड पत्रकार पुरस्कार – २०२६’ प्रदान करून गौरविण्यात आले. मुंबईतील दादर (पूर्व) येथील सुरेंद्र गावसकर हॉल, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय येथे आयोजित भव्य पुरस्कार सोहळ्यात विविध क्षेत्रांतील पत्रकार, साहित्यिक, संपादक, कलाकार, समाजसेवक आणि मान्यवरांच्या उपस्थितीत हा सन्मान सोहळा उत्साहात पार पडला. आर्यारवी एंटरटेनमेंटचे आयोजक श्रीधर कीर जगप्रसिद्ध बोलका बाहुलाकार आणि जादुगार, यांच्या हस्तेशी चंद्रकांत सुतार यांना मानचिन्ह सन्मान पत्र शाल देऊन गौरविण्यात आले. यावेळी लेखक अभिनेते, दिग्दर्शक, पत्रकार महेश्वर भिकाजी तेटांबे, पत्रकार गुरुनाथ तिरपणकर, कवी अरुण म्हात्रे, साहित्यिक पंढरीनाथ तांमोरे , वीसुभाऊ बापट, सुनील शिर्के आदी मान्यवर या वेळी उपस्थिती होते. समाजहितासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत हा प्रतिष्ठेचा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला. चंद्रकांत सुतार हे कोकणवासीय समाज संस्था, माथेरानचे अध्यक्ष असून संस्थेच्या माध्यमातून शैक्षणिक, सामाजिक आणि पर्यावरणपूरक उपक्रम सातत्याने राबवत आहेत. तसेच जनहिताच्या विविध प्रश्नांवर निर्भीडपणे पत्रकारिता करत त्यांनी समाजातील अनेक विषयांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने आवाज उठविला आहे. त्यांच्या या निस्वार्थ सामाजिक व पत्रकारितेतील कार्याची दखल घेत त्यांना हा मानाचा निर्भीड पत्रकार पुरस्कार – २०२६ प्रदान करण्यात आला.

पुरस्कार स्वीकारल्यानंतर चंद्रकांत सुतार यांनी हा सन्मान आपल्या कुटुंबीयांना, सहकाऱ्यांना, मित्रपरिवाराला तसेच सामाजिक कार्यात खंबीर साथ देणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांना समर्पित असल्याची भावना व्यक्त केली. भविष्यातही अधिक जोमाने समाजसेवा आणि निर्भीड पत्रकारितेच्या माध्यमातून जनतेच्या प्रश्नांसाठी कार्यरत राहण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. यावेळी शिवसेना ग्राहक संरक्षण कक्षाचे प्रसारक अनंत पवार हे देखील उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवरांनी चंद्रकांत सुतार यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील सामाजिक व पत्रकारितेच्या वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

# वैवाहिक जोडप्यांना कुटुंबाचा आकार ठरविण्याचा अधिकार

**अक्षराज : वसंत वडस्कर**




**दि.११, विसापूर (चंद्रपूर) :** आपला देश लोकसंख्येत जगात मोठा आहे. आपली लोकसंख्या नियंत्रणात ठेवली पाहिजे. यामुळे बलशाही राष्ट्र निर्माण करण्यासाठी हातभार लागेल, असा आशावाद वैवाहिक जीवनात बाळगला जातो. यात गैर नाही. यातूनच जोडपी छोट्या कुटुंबाची संकल्प करतात. राहणीमान उंचावण्यासाठी कुटुंबाचा आकार छोटा राहणे गरजेचे आहे. आपल्याकडे अपत्य जन्माकडे उत्सव म्हणून पाहिले जाते. अपत्य जन्मानंतर मुलांच्या संगोपनाची जबाबदारी घ्यावी लागते. म्हणून वैवाहिक जोडप्यांना कुटुंबाचा आकार ठरविण्याचा अधिकार आहे, असे प्रतिपादन बल्लारपूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी धनंजय साळवे यांनी जागतिक लोकसंख्या दिनाच्या कार्यक्रमात केले. बल्लारपूर पंचायत समिती व आरोग्य विभागाच्या वतीने स्थानिक खांडक्या बल्लाळशाह सभागृहात ’ माझ गाव, आरोग्य संपन्न गाव ’ अभियान अंतर्गत जागतिक लोकसंख्या दिन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बिडीओ धनंजय साळवे बोलत होते. ११ ते १८ जुलै कालावधीत कुटुंब नियोजन पद्धतीचा प्रसार व प्रचार करण्याच्या अनुषंगाने उपक्रम राबविला जाणार आहे. याची माहिती सदर कार्यशाळेत देण्यात आली. या सप्ताहाचा उत्साहात प्रारंभ करण्यात आला.

कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी गटविकास अधिकारी धनंजय साळवे होते, तर प्रमुख अतिथी म्हणून वैद्यकीय अधिकारी डॉ. अश्विनी कांबळे, डॉ. रुबिना शेख, डॉ. संजय राऊत, बालविकास प्रकल्प अधिकारी शुभांगी वर्हाटे, आरोग्य विस्तार अधिकारी साहेबराव पवार, सतीश कौरासे यांची उपस्थिती होती.

धनंजय साळवे म्हणाले, दरवर्षी नवविवाहित जोडपी होतात. मात्र विवाह नोंदणी कडे गांभीर्याने लक्ष देत नाही. परिणामी आरोग्य विभाग पूर्वनियोजित गर्भधारणा करण्यासंदर्भात समुपदेशन करून लोकसंख्या नियंत्रणात ठेवण्यासाठी फायदेशीर ठरु शकतो. रुग्णालयातील परिचारिका व आरोग्य कर्मचारी वर्ग हे डॉक्टर व सर्वसामान्य लोकांतील दुवा म्हणून कार्यरत आहे, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक साहेबराव पवार यांनी केले. संचालन सतीश कौरासे यांनी, तर आभार प्रदर्शन नयनपाल दुधे यांनी केले. यावेळी समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, सरपंच, प्रशासक, ग्रामपंचायत अधिकारी यांची उपस्थिती होती.